09 FEB 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठांच्या सशक्तीकरणासाठी शासन गंभीर

## मंत्री चंद्रकांतदादा पाटील; शिवाजी विद्यापीठ येथील भुयारी मार्गाचे उद्घाटन

कोल्हापूर : विद्यापीठांना आवश्यक पायाभूत सुविधा आणि शैक्षणिक सुविधा यांची पूर्तता करून त्यांचे सशक्तीकरण करण्याबाबत राज्य शासन गांभीर्याने काम करत आहे, असे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले. शिवाजी विद्यापीठाच्या पूर्व व पश्चिम परिसरांना कायमस्वरूपी जोडणाऱ्या भुयारी मार्गाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

मंत्री पाटील म्हणाले, विद्यापीठांना पायाभूत सुविधा पुरवून त्या अनुषंगाने त्यांचे सक्षमीकरण आवश्यक आहे, तितकेच त्यांचे शैक्षणिक सक्षमीकरण करण्यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने विद्यापीठांनी देश-विदेशांतील विविध विषयांतील तज्ज्ञ प्राध्यापकांना 'प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिस' म्हणून आमंत्रित करून त्यांच्याकडील ज्ञान आपल्या विद्यार्थ्यांना देऊन त्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न करावेत.



कोल्हापूर : भुयारी मार्गाच्या उद्घाटनप्रसंगी मंत्री चंद्रकांत पाटील. सोबत कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आदी. (छाया : पांडुरंग पाटील)

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. महादेव देशमुख, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. शरद बनसोडे, डॉ. सागर डेळेकर, डॉ. तानाजी चौगुले, राहुल चिकोडे, सिद्धार्थ शिंदे, डॉ. रघुनाथ ढमकले, डॉ. व्ही. एम. पाटील, स्वागत परुळेकर आदी उपस्थित होते.

### मंत्री चंद्रकांत पाटील यांच्यामुळेच भुयारी मार्ग

उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांचे सहकार्यामुळेच भुयारी मार्गाचे काम पूर्णत्वास गेले. ते सार्वजनिक बांधकाममंत्री असताना त्यांनी भुयारी मार्गाच्या कामाची घोषणा केली. त्यानंतर उच्च व तंत्रशिक्षणमंत्रिपदाच्या कारकीर्दीत आवश्यक निधीची तरतूद करून कामासाठी सातत्याने पाठपुरावा केला. त्यामुळेच हा मार्ग अस्तित्वात आला, असे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी सांगितले.

### भाषेचे अभ्यासक्रम सुरू करा

सध्या कमवा आणि शिका योजनेंतर्गत विद्यार्थिनींचे कामाचे तास आणि त्यांना देण्यात येणारे शुल्कही वाढवावे. तसेच कोल्हापूर परिसरात सिंधी, गुजराती, राजस्थानी बांधवही कामानिमित्ताने स्थायिक झाले आहेत. त्यांनाही त्यांच्या मातृभाषेतून शिकण्याचा हक्क प्रदान केला पाहिजे. त्यासाठी या भाषांतील तीन महिन्यांचे प्रमाणपत्र अभ्यासक्रम विद्यापीठाने सुरू करावेत, अशी सूचना मंत्री पाटील यांनी केली.

09 FEB 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'कमवा व शिका'च्या मानधनात वाढ करा

## उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील : शिवाजी विद्यापीठातील भुयारी मार्गाचे उद्घाटन

कोल्हापूर, ता. ८ : 'शिवाजी विद्यापीठातील कमवा व शिका योजनेचे सशक्तीकरण करून विद्यार्थ्यांच्या मानधनात वाढ करा', असे आवाहन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज येथे केले.

विद्यापीठातील पूर्व-पश्चिम परिसराला जोडणाऱ्या भुयारी मार्गाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. त्यांच्या हस्ते कोनशिलेचे अनावरण व भुयारी मार्गाचे फित कापून उद् घाटन झाले. त्यानंतर मंत्री पाटील भुयारी मार्गातून पायी पूर्व बाजूला गेले. तेथे त्यांनी माध्यमांशी संवाद साधला.

मंत्री पाटील म्हणाले, 'विद्यापीठातील कमवा व शिका योजनेसाठी सीएसआर मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील राहू. विद्यापीठाने योजनेतील विद्यार्थ्यांच्या संख्येचा आकडा वाढवून त्यांचे प्रति तास मानधन वाढवावे. मुलींचे शैक्षणिक शुल्क माफ झाले असले तरी त्यांना अन्य खर्चासाठी पैसे लागतात. त्यांना महिन्याकाठी दोन अडीच हजार रुपये मिळायला हवेत.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पूर्व-पश्चिम परिसराला जोडणाऱ्या भुयारी मार्गाच्या उद् घाटनानंतर भुयारी मार्गातून चालताना उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील. शेजारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. शरद बनसोडे आदी.

विद्यापीठांच्या आवश्यकता पूर्ण केल्यानंतरच विद्यापीठे सशक्त होणार आहेत. प्राध्यापकांच्या मान्यतेसह विद्यापीठीय खर्चाच्या मान्यतेसाठी प्रयत्नशील आहोत. विविध विषयांतील प्राध्यापकांना 'प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिस' म्हणून विद्यापीठात आमंत्रित करावे, अशी आमची इच्छा आहे. त्यांना त्यासाठीचे मानधन व प्रवास खर्च देण्यात यावा. हे प्राध्यापक अमेरिकेसह अन्य देशांतून आणले तरी चालतील. विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढवणे गरजेचे असताना त्याकरिता पैसे देऊनही ते होत नाही, असा अनुभव आहे. कारण तशी माणसे मिळत नाही. विद्यापीठाने जागतिक पातळीवरील विविध विद्यापीठांशी करार करून ही माणसे उपलब्ध करावीत.'

ते पुढे म्हणाले, 'परदेशातील विद्यार्थी आपले पाहुणे या दृष्टिकोनातून त्यांना आपुलकीची वागणूक देणे आवश्यक आहे. ती नागरिकांची जबाबदारी असून, त्यांच्या राहण्याची सुविधा चांगली असली पाहिजे. त्यांना हे शहर आपले कसे वाटेल, यावर लक्ष देणे जरुरीचे आहे. गांधीनगरमधील सिंधी महाविद्यालयाला शंभर वर्षे पूर्ण झाली असून, तेथे विद्यार्थ्यांची संख्या चांगली आहे. सिंधी भाषेचे संवर्धन करण्यासाठी तेथे सूचना केली आहे. या भाषेचा विद्यापीठाने तीन महिन्यांचा अभ्यासक्रम तयार करावा. गुजराती, राजस्थानी समाजातून त्यांच्या भाषेतून अभ्यासक्रमाची मागणी झाली तर त्याचीही पूर्तता करावी. विद्यापीठाने त्यादृष्टीने प्रस्ताव तयार करावा.'

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी भुयारी मार्गासाठी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री पाटील यांनी सातत्याने पाठपुरावा केल्याने तो आज पूर्णत्त्वास आल्याचे सांगितले. या प्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. महादेव देशमुख, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. शरद बनसोडे, सागर डेळेकर, डॉ. तानाजी चौगुले, राहुल चिकोडे आदी उपस्थित होते.

### भुयारी मार्गामुळे प्रवास सुखकर

विद्यापीठातील मुख्य प्रवेशद्वारातून ये-जा करताना विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी वर्गास अडथळे येत होते. भुयारी मार्गामुळे त्यांचा प्रवास सुखकर झाला आहे. एक वर्षात त्याचे काम पूर्ण झाले. त्याची लांबी ३१.३२ मीटर असून, रुंदी ८.५० मीटर, तर उंची ३ मीटर आहे. वाहन मार्ग ५.५० मीटर असून, दोन्ही बाजूला १.२५ मीटरचा पदपथ आहे. या मार्गाच्या उद् घाटनाची उत्सुकता लागून राहिलेले विद्यार्थी आवर्जून उपस्थित होते. कोनशिलेच्या अनावरणानंतर त्यांनी पायी भुयारी मार्गातून ये-जा केली.

09 FEB 2025

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'कमवा व शिका' योजनेचे सशक्तीकरण करणार

## चंद्रकांत पाटील : विद्यापीठातील भुयारी मार्गाचे उद्घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात राबवीत असलेल्या 'कमवा व शिका' योजनेची व्याप्ती वाढवून अधिक सशक्तीकरण करणार असल्याची घोषणा उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी शनिवारी केली. शिवाजी विद्यापीठाच्या पूर्व व पश्चिम परिसरांना कायमस्वरूपी जोडणाऱ्या भुयारी मार्गाचे उद्घाटन शनिवारी मंत्री पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव उपस्थित होते. या भुयारी मार्गासाठी ८ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत.

मंत्री पाटील म्हणाले, 'कमवा व शिका' योजनेंतर्गत काम करणाऱ्या विद्यार्थिनींचे कामाचे तास व त्यासाठी देण्यात येणारे शुल्कही वाढवावे. यासाठी खासगी उद्योगांकडून सामाजिक दायित्व निधी मिळवून देण्यासाठी प्रयत्न करू. साधारणतः अडीच हजार रुपयांचा अधिकचा निधी विद्यार्थिनींना मिळून त्यांचे सक्षमीकरण होईल. विद्यापीठांनी देशविदेशांतील विविध विषयांतील तज्ज्ञ प्राध्यापकांना 'प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस' म्हणून आमंत्रित करून गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न करावेत. यावेळी पाटील यांच्या हस्ते कोनशिला अनावरण करण्यात आले. त्यांनी विद्यापीठाच्या परिसरात लोकांच्या दातृत्वातून साकारत असलेल्या लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृहाच्या कामास भेट देऊन त्याविषयी माहिती घेतली. सार्वजनिक बांधकाम मंडळाचे अधीक्षक अभियंता तुषार बुरूड, पुण्याच्या अस्टुट इन्फ्रास्ट्रक्चरचे प्रतिनिधी विनायक पारळकर, रमेश भोजकर, श्रीकांत गुजर उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठाचा पूर्व-पश्चिम परिसर जोडणाऱ्या भुयारी मार्गाचे उद्घाटन उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते शनिवारी झाले. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील उपस्थित होते.

## 'सिंधी, गुजराती, राजस्थानी भाषांसाठी प्रस्ताव द्या'

कोल्हापूर परिसरात सिंधी, गुजराती, राजस्थानी बांधवही कामानिमित्ताने स्थायिक झाले आहेत. आपण मातृभाषेतून शिक्षणाचा आग्रह धरीत असताना त्यांनाही त्यांच्या मातृभाषेतून शिकण्याचा हक्क प्रदान केला पाहिजे. त्या दृष्टीने सुरुवातीला या भाषांतील ३ महिन्यांचे प्रमाणपत्र अभ्यासक्रम विद्यापीठाने सुरू करावेत. शिवाजी विद्यापीठाने या भाषांच्या संवर्धनाच्या अनुषंगाने तसा प्रस्ताव सादर करावा, अशी सूचना मंत्री पाटील यांनी केली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 FEB 2025
लोकसत्ता

# विद्यापीठांच्या सशक्तीकरणाबाबत राज्य शासन गंभीर : चंद्रकांत पाटील

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**कोल्हापूर** : विद्यापीठांना आवश्यक पायाभूत सुविधा आणि शैक्षणिक सुविधा यांची पूर्तता करून त्यांचे सशक्तीकरण करण्याबाबत राज्य शासन गांभीर्याने काम करीत आहे, असे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज येथे सांगितले.

शिवाजी विद्यापीठाच्या पूर्व व पश्चिम परिसरांना जोडणाऱ्या भुयारी मार्गाचे उद्घाटन आज मंत्री पाटील यांच्या हस्ते झाले. त्यावेळी उद्घाटनानंतर ते म्हणाले, विद्यापीठांनी देशविदेशांतील विविध विषयांतील तज्ज्ञ प्राध्यापकांना 'प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस' म्हणून आमंत्रित करून त्यांच्याकडील ज्ञान आपल्या विद्यार्थ्यांना देऊन त्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न करावेत.

कोल्हापूर परिसरात सिंधी, गुजराती, राजस्थानी बांधवही कामानिमित्ताने स्थायिक झाले आहेत. सुरवातीला या भाषांतील तीन महिन्यांचे प्रमाणपत्र अभ्यासक्रम विद्यापीठाने सुरू करावेत, अशी सूचना त्यांनी कुलगुरू डॉ. शिर्के यांना केली.

09 FEB 2025
तरूण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्राध्यापक भरतीची परवानगी वित्त विभागाकडे मागितली

- मंत्री चंद्रकांत पाटील यांची माहिती



कोल्हापूर : भुयारी मार्गाच्या उद्घाटनानंतर पत्रकारांशी संवाद साधताना मंत्री चंद्रकांत पाटील. सोबत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदी.

प्रतिनिधी
कोल्हापूर

राज्यातील सर्व विद्यापीठांमध्ये ७०० प्राध्यापकांच्या जागा मंजूर केल्या आहेत. मात्र, राज्यपालांनी भरतीस स्थगिती दिली आहे. २१०० जागा महाविद्यालय व ७०० जागा विद्यापीठांमध्ये भरण्यासाठी २० वर्षांनंतर संधी मिळाली असून राज्यपालांकडे ही स्थगिती उठविण्याची मागणी केली आहे, अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी शनिवारी पत्रकारांशी बोलताना दिली.

मंत्री पाटील म्हणाले, 'एमपीएसी'मार्फत प्राध्यापक भरती करणे वस्तुत: शक्य नाही. म्हणून राज्यपाल यांना सर्व माहिती देण्याचे काम सुरु आहे, २०१७ ते २०२५ या कालावधीत प्राध्यापकांच्या जागा भरण्यासंदर्भात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे परवानगी मागितली असल्याचे त्यांनी सांगितले. येत्या काही दिवसात प्राध्यापक भरती केली जाईल.सेवानिवृत्ता प्राध्यापकांच्या जागाही भरल्या जाणार आहेत, त्यासंदर्भात शासन पातळीवर पाठपुरावा सुरू आहे. त्यामुळे नेट-सेट परीक्षा पात्र उमेदवारांना नोकरीची संधी मिळणार, हे निश्चित, असेही पाटील यांनी सांगितले.

### संबंधित संस्थेवर थेट कारवाई करणार

मुलांना शंभर टक्के उच्च शिक्षण मोफत दिले जात आहे. परंतू काही संस्था अडवणूक करून पैसे घेत आहेत, याबाबत मंत्री पाटील म्हणाले, अशा संस्थांविरोधात तक्रार दिल्यास त्यांच्यावर थेट कारवाई केली जाईल. दोन दिवसांपूर्वी बांद्रा येथील एका कॉलेजमध्ये गेलो. १४८ मुलींना एक रूपयाही न भरता प्रवेश मिळाला. मोफत शिक्षण दिले जाते की नाही हे पाहण्यासाठी प्रत्येक आठवडयास एका कॉलेजला भेट देणार असल्याचे त्यांनी सांगितले.

09 FEB 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्त्रीवादी दृष्टिकोनातून चित्रपटांचा अभ्यास आवश्यक

## डॉ. राजेंद्र गोणारकर : शिवाजी विद्यापीठ स्त्री अभ्यास केंद्राच्या वतीने सेमिनार



कोल्हापूर : 'श्याम बेनेगल यांच्या चित्रपटातील महिला प्रतिमा' या विषयावरील सेमिनारच्या समारोपप्रसंगी डॉ. राजेंद्र गोणारकर, निशा मुडे-पवार आदी मान्यवर.

कोल्हापूर : प्रतिनिधी

सर्वच चित्रपट हे स्त्रीवादी असत नाहीत, त्यामुळे स्त्रीवादी आकलन करून, महिला दृष्टिकोनातून श्याम बेनेगल यांच्या चित्रपटातील महिला व्यक्तिरेखांचा अभ्यास करणे अधिक उचित ठरेल, असे मत स्वामी रामानंद विद्यापीठाच्या माध्यम संकुलाचे संचालक प्रा. डॉ. राजेंद्र गोणारकर यांनी व्यक्त केले. ते शिवाजी विद्यापीठाच्या स्त्री अभ्यास केंद्राच्या वतीने आयोजित 'श्याम बेनेगल यांच्या चित्रपटातील महिला प्रतिमा' या विषयावरील दोन दिवसांच्या राज्यस्तरीय सेमिनारच्या समारोपप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्राच्या संचालक प्रा. डॉ. निशा मुडे-पवार होत्या.

याप्रसंगी फिल्म इन्स्टिट्यूट, पुणे येथील डॉ. प्रसाद ठाकूर यांनी संशोधकांनी सादर केलेल्या वीस संशोधन पेपरचा आढावा घेऊन उपस्थितांना मार्गदर्शन केले. डॉ. ठाकूर यांनी यावेळी संशोधकांनी चित्रपटांची पार्श्वभूमी, चित्रपट निर्मितीचे विविध घटक आणि 'दृश्यात्मक साक्षरता' याविषयी अभ्यास केला पाहिजे, असे मत व्यक्त केले. चित्रपट समीक्षक सरफराज मुल्ला यांनी, श्याम बेनेगल यांनी आपल्या चित्रपटांतून सामाजिक चौकटीतील महिलांच्या पारंपरिक प्रतिमा न मांडता 'स्वत्वाचा शोध' घेणाऱ्या स्त्री प्रतिमा मांडल्या, असे मत व्यक्त केले. एमजीएम विद्यापीठाच्या डॉ. विशाखा गारखेडकर यांनी श्याम बेनेगल यांच्या अंकुर, निशांत, मंथन आणि भूमिका या चित्रपटांतील स्त्री प्रतिमांचा आढावा घेतला. सूत्रसंचालन संशोधक विद्यार्थिनी अश्विनी कांबळे यांनी केले. प्रा. डॉ. निशा मुडे-पवार यांनी लवकरच 'श्याम बेनेगल यांच्या चित्रपटातील महिला प्रतिमा' या विषयावर संशोधन पेपर पुस्तक रूपाने प्रकाशित करण्याचा स्त्री अभ्यास केंद्राचा मानस असल्याचे सांगितले.

09 FEB 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कमवा, शिका योजना सक्षम करून वेतन वाढवा

## उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या विद्यापीठाला सूचना : शिवाजी विद्यापीठातील भुयारी मार्गाचा लोकार्पण सोहळा

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील प्राथमिक सोयीसुविधा व अॅकॅडमीक सुविधा देण्यातूनच विद्यापीठ सशक्त होतील. प्राध्यापक मान्यता व त्यांचा पगार सरकार देण्याबरोबर इतर देशातून तज्ज्ञ आणून त्यांचा सर्व खर्च करा. यातून विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढवा. विद्यार्थीनींना प्रवेश शुल्का व्यतिरिक्त वसतिगृह, जेवण आणि पॅकेटमनीसाठी अडीच हजार रूपये जादा मिळाले पाहिजेत. कमवा व शिका योजनेतून आर्थिकदृष्ट्या मुली सक्षम झाल्या पाहिजेत. त्यासाठी कमवा शिका योजनेचे सशक्तीकरण प्रत्येक तासाचे पैसे वाढवा. हा प्रस्ताव त्वरीत राज्य शासनाकडे पाठवा, अशा सूचना विद्यापीठ प्रशासनाला उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिल्या.

विद्यापीठाच्या पूर्व व पश्चिम परिसरांना कायमस्वरूपी जोडणाऱ्या भुयारी मार्गाचे उद्घाटन मंत्री पाटील यांच्या हस्ते झाले. यप्रसंगी ते बोलत होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील भुयारी मार्गाचे उद्घाटन करताना उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील. सोबत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदी.

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पाटील म्हणाले, शिवाजी विद्यापीठातील कमवा व शिका योजनेअंतर्गत काम करीत असणाऱ्या विद्यार्थिनींच्या कामाचे तास आणि त्यासाठी त्यांना देण्यात येणारे शुल्कही वाढवावे. त्यासाठी लागणारा निधी मिळवून देण्यासाठी मी प्रयत्न करणार आहे. जेणे करून विद्यार्थीनींना कामाचा भरपूर मोबदला मिळेल आणि त्यांना घरातून पैसे मागवावे लागणार नाहीत. यासाठी जवळपास अडीज हजार रूपये विद्यार्थ्यांना मिळावे. तसेच एखादा कोर्स तयार करा त्याला फंड द्यायला सरकार तयार आहे. परदेशातून तज्ज्ञ गेस्ट लेक्चर बोलवून छोटे अभ्यासक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण द्या. दर्जेदार शिक्षण देण्यासाठी माणस मिळत नाहीत, विद्यापीठाच्या जगातील इतर विद्यापीठात सामंजस्य करार करा. तसेच परदेशातील विद्यार्थ्यांना उत्तम राहण्याची सुविधा उपलब्ध करून द्या. परदेशातील विद्यार्थी आपले पाहुणे आहेत, अशा प्रकाराने कोल्हापुरातील नागरिकांनी वागले पाहिजे. जणेकरून आपल्या शहराचे इतर देशात आदराने नाव घेतले पाहिजे. निर्माण केला पाहिजे.

### सिंधी, गुजराती, राजस्थानी भाषा अभ्यासक्रमांसाठी प्रस्ताव द्या

कोल्हापूर परिसरात सिंधी, गुजराती, राजस्थानी बांधवही कामानिमित्ताने स्थायिक झाले आहेत. आपण मातृभाषेतून शिक्षणाचा आग्रह धरीत असताना त्यांनाही त्यांच्या मातृभाषेतून शिकण्याचा हक्क प्रदान केला पाहिजे. त्या दृष्टीने सुरुवातीला या भाषांतील ३ महिन्यांचे प्रमाणपत्र अभ्यासक्रम विद्यापीठाने सुरू करावेत, जेणे करून या बांधवांना आणि त्यांच्या कुटुंबियांना मातृभाषा शिक्षण घेता येऊ शकेल. शिवाजी विद्यापीठाने या भाषांच्या संवर्धनाच्या अनुषंगाने तसा प्रस्ताव सादर करावा, अशी सूचना मंत्री पाटील यांनी कुलगुरू डॉ. शिर्के यांना दिली.

0 9 FEB 2025
Times of India
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Patil credits PM's works for BJP's success in Haryana, Maha & Delhi

## 'Modi Magic' Intact And Here To Stay, Says Minister

Rahul.Gayakwad
@timesofindia.com



TOI

Chandrakant Patil along with SUK administrative officials

**Kolhapur:** Higher and technical education minister Chandrakant Patil on Saturday said despite the opposition's brief success in the 2023 Lok Sabha election, fuelled by a "fake narrative", BJP's winning streak has continued unabated, as seen in Haryana, Maharashtra and now in Delhi assembly polls, demonstrating the popularity of PM Narendra Modi.

Patil was in the city to inaugurate a new subway connecting the main building of SUK to its eastern departments like the department of technology and agriculture. This underground passageway would provide a safe route for students, teachers and staff, eliminating the need to cross the busy old Pune-Bengaluru highway.

Addressing the media after the inauguration, the minister said, "The trust in PM Modi has increased among people because of his work, first as the chief minister of Gujarat for 15 years, and then as the PM from 2014. After last year's Lok Sabha election, the opposition parties started feeling that Modi 'magic' was waning, but they must know that it is continuing and will never end. The common man has trust in Modi's leadership."

Patil said the opposition would now start blaming EVMs. "On Friday, (leader of opposition in the Lok Sabha) Rahul Gandhi held a press conference and blamed the Election Commission of India. People are fed up now hearing the same old things. If Congress wins in Karnataka, EVMs are good. If NDA's tally in Lok Sabha goes down, EVMs are good. But if they lose, the same EVMs become prone to manipulation."

Speaking over Shiv Sena (UBT) MP Sanjay Raut's claims that if Congress and AAP had contested together, the Delhi election outcome would have been different, the minister said, "Raut is a great leader. He could have brought Congress and AAP together if he wanted. Sena (UBT) supported AAP in Delhi elections, and this highlights that not everything is alright in their alliance. I guess Congress will exit from the INDIA bloc."

SUK vice-chancellor Dr D T Shirke, pro-VC Dr Pramod Patil, registrar Dr Vilas Shinde, director of examination and evaluation department Dr Ajitsinha Jadhav, among other officials, and students were present.

## Liquor policy drowned Kejriwal & AAP in Delhi, says Anna Hazare

**Pune:** Social activist Anna Hazare, the former mentor of Delhi's ex-chief minister Arvind Kejriwal, on Saturday said the AAP's downfall was brought by its flawed liquor policy to bring money.

Hazare spoke to the media at his village Ralegan Siddhi in Ahilyanagar district, amid the announcement of the Delhi assembly election results. "He (Kejriwal) held the first meeting in Delhi with the intention to enter into politics and form a new party. He invited all those who were interested in joining him. Since I never wanted to join any party, I stayed away from it. When he formed the party, people trusted and supported him. Later, however, he started promoting liquor and went after money," Hazare said. **—Anurag Bende**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 FEB 2025
लोकमत

# अर्थसंकल्प डोळसपणे समजून घ्यावा : महाजन

लोकमत न्यूज नेटवर्क

**गडहिंग्लज :** गतवर्षीच्या अर्थसंकल्पांतील तरतुदी, त्यांची अंमलबजावणी आणि नव्या अर्थसंकल्पातील तरतुदी याचा तुलनात्मक अभ्यास करून त्यातील अर्थ शोधावा. किंबहुना, अर्थसंकल्प डोळसपणे समजून घ्यावा, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य आणि व्यवस्थापन विभागाचे प्रमुख डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले.

गडहिंग्लज चेंबर ऑफ कॉमर्स व सारथी चॅरिटेबल ट्रस्टतर्फे आयोजित 'केंद्रीय अर्थसंकल्प २०२५' या विषयावर ते बोलत होते. महाजन म्हणाले, अर्थसंकल्पात प्रामुख्याने आरोग्य, शिक्षण, शेती, उद्योग याबरोबरच विकास प्रकल्पांसाठी तरतूद केली जाते. शिक्षणासाठीची केवळ ३ टक्के तरतूद तुटपुंजी असून त्यात नव्या धोरणातील शैक्षणिक आराखडा राबविण्याचे आव्हान आहे. उद्योगासाठीची तरतूददेखील अपुरी आहे.मध्यमवर्गाला



नजरेसमोर ठेवून १२ लाखांपर्यंतचे उत्पन्न आयकरमुक्त करण्यात आले आहे. त्यामुळे अर्थसंकल्पाची चर्चा १२ लाखांच्याभोवतीच सुरू आहे. परंतु, स्वातंत्र्यानंतर तळागाळातील लोकांना काय मिळाले ? त्यांचे जीवनमान किती उंचावले ? हे पाहायला हवे.पर्यटनाबरोबरच शेतीमालाच्या वाहतुकीसाठी रस्ते विकास आवश्यक आहेत. रस्ते विकासासाठी मोठ्या प्रमाणात तरतूद केल्यामुळे बाजारपेठेतील उलाढाल वाढून अर्थव्यवस्थेला चालना मिळेल. यावेळी अंजना रेडेकर, कल्याणराव पुजारी, विद्याधर गुरबे, नंदकुमार शेळके, दिग्विजय कुराडे, साताप्पा कांबळे, आदी उपस्थित होते.डॉ. ज्ञानराजा चिघळीकर यांनी स्वागत केले. प्रा. सुनिल शिंत्रे यांनी प्रास्ताविक केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 FEB 2025
सकाळ

# भारती विद्यापीठ अभियांत्रिकीत कार्यशाळा

कोल्हापूर, ता. ८ : परिसस्पर्श योजनेंतर्गत शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता हमी कक्ष आणि भारती विद्यापीठ अभियांत्रिकी महाविद्यालयातर्फे भारती अभियांत्रिकीत शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी कार्यशाळा झाली.

योगेश हुपरीकर यांनी टीमवर्क, सामाजिक वर्तनासाठी शिक्षण यावर चर्चा केली. प्राचार्य डॉ. विजय आर. घोरपडे यांनी मार्गदर्शन केले. डॉ. आर. घोरपडे यांनी या कार्यशाळेमुळे शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात अधिक प्रभावीपणे काम करण्याची प्रेरणा मिळाली, असे सांगितले. डॉ. जयमाला पाटील यांनी नियोजन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

09 FEB 2025

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी
BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur
Mob.- 9175089609

# मानवी संस्कृतींच्या विविध रूपांचा आदर आवश्यक: डॉ. मेघा पानसरे

## विद्यापीठात 'कार्निव्हल-२०२५'ची सांगितिक सांगता



**कोल्हापूर :**

जगामधील विविध मानवी संस्कृतींच्या विविध रूपांचा माणूस म्हणून प्रत्येकाने आदर केला पाहिजे. विदेशी भाषा आत्मसात करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी तर ही खूप महत्त्वाची बाब आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या विदेशी भाषा अधिविभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या विदेशी भाषा अधिविभागातर्फे विविध देशांच्या कलांचे दर्शन घडविणाऱ्या 'कार्निव्हल-२०२५' या कला-सांस्कृतिक महोत्सवाच्या सांगता समारंभामध्ये डॉ. पानसरे बोलत होत्या. कार्यक्रमाचे आयोजन वनस्पतीशास्त्र अधिविभागाच्या नीलांबरी सभागृहात करण्यात आले.

डॉ. पानसरे म्हणाल्या, जगामध्ये स्थलांतर होत असतात, मानवी समूह एकमेकांमध्ये मिसळत असतात. त्यावेळी विदेशी भाषा शिक्षणाचा चांगला उपयोग होतो. शिक्षणासाठी, व्यवसायासाठी, नोकरीसाठी परदेशात जाणाऱ्यांना या विदेशी भाषा अवगत असणे खूप महत्त्वाचे असते. विदेशी भाषा शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी भाषेचा सातत्याने सराव केल्यास ती जागतिक भाषा आणि त्या देशातील संस्कृती कायम स्मरणात राहते.

कार्यक्रमात विविध विदेशी भाषांमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. त्यानंतर, निधी सावर्डेकर यांच्या जर्मन सोलोवर आधारित भरतनाट्यमने कार्यक्रमाची सुरूवात झाली. जपान, जर्मनी, रशिया आणि पोर्तुगीज देशांची सोलो गीते, कविता, समूहगीते, कथा-कथन, नाटक अशा बहारदार विविधांगी १९ कार्यक्रमांच्या सादरीकरणातून विदेशी भाषा अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी जागतिक कला-संस्कृतीचे दर्शन घडविले. कार्यक्रमास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

राजवर्धन पाटील आणि निधी सावर्डेकर यांनी सूत्रसंचालन केले, तर ऐश्वर्या चव्हाण यांनी आभार मानले. कार्यक्रमास डॉ.अनिल घुले यांच्यासह ज्योती पाटील, प्रियांका माळकर, गीतांजली शहा, स्नेहल शेटे, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महा न्यूज & व्ह्यूज


वामाक्षी BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

09 FEB 2025

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठांच्या सशक्तीकरणाबाबत राज्य शासन गंभीर : मंत्री चंद्रकांतदादा पाटील

## शिवाजी विद्यापीठाचे पूर्व-पश्चिम परिसर जोडणाऱ्या भुयारी मार्गाचे उद्घाटन





कोल्हापूर, (महा न्यूज अँण्ड व्ह्यूज) :

विद्यापीठांना आवश्यक पायाभूत सुविधा आणि शैक्षणिक सुविधा यांची पूर्तता करून त्यांचे सशक्तीकरण करण्याबाबत राज्य शासन गांभीर्याने काम करीत आहे, असे महाराष्ट्राचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी आज येथे सांगितले.

शिवाजी विद्यापीठाच्या पूर्व व पश्चिम परिसरांना कायमस्वरुपी जोडणाऱ्या भुयारी मार्गाचे उद्घाटन आज मंत्री श्री. पाटील यांच्या हस्ते झाले. त्यावेळी उद्घाटनानंतर ते बोलत होते.

मंत्री श्री. पाटील म्हणाले, विद्यापीठांना पायाभूत सुविधा पुरवून त्या अनुषंगाने त्यांचे सक्षमीकरण जितके आवश्यक आहे, तितकेच त्यांचे शैक्षणिक सक्षमीकरण करण्यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने विद्यापीठांनी देशविदेशांतील विविध विषयांतील तज्ज्ञ प्राध्यापकांना 'प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस' म्हणून आमंत्रित करून त्यांच्याकडील ज्ञान आपल्या विद्यार्थ्यांना देऊन त्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न करावेत. शिवाजी विद्यापीठाने विविध परदेशी विद्यापीठांशी सहकार्य करार केले आहेत, ही चांगली बाब आहे. पुढील काळात याचे प्रमाण वृद्धिंगत करावे, असेही त्यांनी सांगितले.

''कमवा व शिका' योजनेचे सशक्तीकरण करावे'

यावेळी मंत्री श्री. पाटील यांनी शिवाजी विद्यापीठाच्या 'कमवा व शिका' योजनेचे अधिक सशक्तीकरण करावे, अशी सूचना केली. ते म्हणाले, सध्या या योजनेअंतर्गत काम करीत असणाऱ्या विद्यार्थिनींचे कामाचे तास आणि त्यासाठी त्यांना देण्यात येणारे शुल्कही वाढवावे. यासाठी काही खाजगी उद्योगांकडून सामाजिक दायित्व निधी मिळवून देण्यासाठीही आपण प्रयत्न करू, जेणे करून योजनेतून मिळणाऱ्या निधीव्यतिरिक्त साधारण अडीच हजार रुपयांचा अधिकचा निधी संबंधित विद्यार्थिनींना मिळून त्यांचे सक्षमीकरण होईल, असे ते म्हणाले.

### भुयारी मार्गाचे काम एक वर्षात पूर्ण

गत वर्षी ३ फेब्रुवारीला भुयारी मार्गाच्या कामाचे भूमिपूजन मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते करण्यात आले होते. यानंतर वर्षभराच्या अवधीत हे काम पूर्णत्वास गेले आहे. यामध्ये विद्यापीठ परिसराच्या पूर्व व पश्चिम बाजूचे जोड रस्ते व सेवा मार्ग आणि भुयारी मार्ग यांचा समावेश आहे. पश्चिम बाजूकडील जोड रस्त्याची लांबी १६६ मीटर इतकी तर पूर्व बाजूकडील जोड रस्त्याची लांबी २९.३२ मीटर इतकी आहे. भुयारी मार्गाची लांबी ३९.३२ मीटर असून रुंदी ८.५० मीटर आणि उंची ३ मीटर आहे. भुयारी मार्गातील वाहनमार्ग ५.५० मीटर इतका असून दोही बाजूला १.२५ मीटरचा पदपथ आहे. पूर्व बाजूस महामार्गावरुन खाली उतरण्यासाठी जिना, पश्चिम बाजूकडील जोड रस्त्यासाठी रिटेनिंग भिंत आणि पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी आर.सी.सी. गटर आदी कामेही या अंतर्गत करण्यात आली आहेत.

झाले आहेत. आपण मातृभाषेतून शिक्षणाचा आग्रह धरीत असताना त्यांनाही त्यांच्या मातृभाषेतून शिकण्याचा हक्क प्रदान केला पाहिजे. त्या दृष्टीने सुरवातीला या भाषांतील ३ महिन्यांचे प्रमाणपत्र अभ्यासक्रम विद्यापीठाने सुरू करावेत, जेणे करून या बांधवांना आणि त्यांच्या कुटुंबियांना मातृभाषा शिक्षण घेता येऊ शकेल. शिवाजी विद्यापीठाने या भाषांच्या संवर्धनाच्या अनुषंगाने तसा प्रस्ताव सादर करावा, अशी सूचना त्यांनी कुलगुरू डॉ. शिर्के यांना केली.

**मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्यामुळेच भुयारी मार्ग अस्तित्वात: कुलगुरू डॉ. शिर्के**

राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांचे सहकार्य आणि सातत्यपूर्ण पाठपुरावा यामुळेच शिवाजी विद्यापीठाच्या पूर्व व पश्चिम परिसरांना जोडणाऱ्या भुयारी मार्गाचे काम पूर्णत्वास गेले, असे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी सांगितले. ते म्हणाले, चंद्रकांतदादा पाटील हे सार्वजनिक बांधकाम मंत्री असताना त्यांनी या भुयारी मार्गाच्या कामाची घोषणा केली. त्यानंतर उच्च व तंत्र शिक्षण मंत्री पदाच्या कारकीर्दीत त्याला आवश्यक निधीची तरतूद करून त्याच्या कामासाठी शासकीय यंत्रणांचे संपूर्ण सहकार्य मिळवून देण्यापासून ते काम पूर्ण होईपर्यंत सातत्याने

यावेळी सुरवातीला मंत्री श्री. पाटील यांच्या हस्ते कोनशिला अनावरण करण्यात आले. त्यानंतर फीत कापून भुयारी मार्गाचे उद्घाटन करण्यात आले. त्यांच्यासह सर्वच मान्यवरांनी भुयारी मार्गाची चालत जाऊन पाहणी केली. झालेल्या कामाबद्दल मंत्री श्री. पाटील यांनी समाधान व्यक्त केले. त्यानंतर मंत्री श्री. पाटील यांनी विद्यापीठाच्या परिसरात लोकांच्या दातृत्वातून साकारत असलेल्या लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृहाच्या कामास भेट देऊन त्याविषयी माहिती घेतली.

यावेळी सार्वजनिक बांधकाम मंडळाचे अधिक्षक अभियंता तुषार बुरुड, पुण्याच्या ॲस्टुट इन्फ्रास्ट्रक्चरचे प्रतिनिधी विनायक पावळकर, स्थापत्य कामाचे ठेकेदार रमेश भोजकर, विद्युत कामाचे ठेकेदार श्रीकांत गुजर यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, डॉ. श्रीकृष्ण महाजन, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, इनोव्हेशन, इनक्युबेशन केंद्राचे संचालक डॉ. सागर डेळेकर, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले, राहुल चिकोडे, व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे, डॉ. रघुनाथ ढमकले, डॉ. व्ही.एम.

09 FEB 2025

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज




# केंद्रीय अर्थसंकल्प दखलपात्र : डॉ. केदार मारुलकर



**कोल्हापूर :**

केंद्र सरकारने आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी सादर केलेला केंद्रीय अर्थसंकल्प हा जगाला भारताची दखल घ्यायला लावणारा आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठ वाणिज्य अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा.डॉ.के.व्ही.मारुलकर यांनी आज केले.

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील वाणिज्य विषयांतर्गत 'केंद्रीय अर्थसंकल्प २०२५' या विषयावर आयोजित विशेष ऑनलाईन व्याख्यानात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रभारी संचालक डॉ. कृष्णा पाटील होते. उपकुलसचिव व्ही.बी. शिंदे उपस्थित होते. डॉ. मारुलकर म्हणाले,भारतीय अर्थसंकल्पावर अमेरिकन अर्थव्यवस्था तसेच भू -राजकीय अर्थव्यवस्थेचा परिणाम झालेला दिसून येतो. व्यक्तीगत आर्थिक कर कमी करुन नव्या उत्पादनासाठी तो पैसा वापरण्यावर भर आहे. आयकर कायदा १९६१ ऐवजी नवीन कायदा येत्या आर्थिक वर्षापासून लागू करण्यात येणार आहे. स्टार्टअपसाठी आर्थिक मदत वाढवून देण्यावर भर देण्यात आला आहे. कृत्रिम बुद्धीमत्ता (-ख) क्षेत्रात गुंतवणूक वाढवून या क्षेत्रात जगातील तिसरा देश बनण्याचा हेतू यातून दिसतो. उद्योग क्षेत्रात आर्थिक वाढ करुन ऊर्जा क्षेत्राला भरभराट आणण्याचे प्रयत्न आहेत. कर्करोगावरील औषधे स्वस्त व सवलतीत देण्यात येणार आहेत. तसेच विमा कंपन्यामध्ये परकीय गुंतवणूक मर्यादा ७४ टक्क्यांवरून १०० टक्क्यापर्यंत वाढविली आहे. किसान क्रेडिट कार्डच्या माध्यमातून ५ लाखापर्यंत कर्ज पुरवठा करण्यात येणार आहे. ईशान्येकडील राज्यांसाठी अन्न प्रक्रिया उद्योगावर भर देण्यात आला आहे. भारतीय भाषांमध्ये शैक्षणिक पुस्तके उपलब्ध करुन देण्याबाबत सूचित करण्यात आले आहे. एकूणच हा अर्थसंकल्प भविष्यकाळातील आव्हानास सामोरे जाण्यासाठी सरकारने उचललेले आश्वासक पाऊल आहे, असे डॉ. मारुलकर म्हणाले.

डॉ. पाटील म्हणाले,अर्थसंकल्पातून देशाच्या पुढील पाच वर्षाच्या आर्थिक धोरणांचे प्रतिबिंब उमटले आहे. अर्थसंकल्प २०२५-२६ हा देशाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीकोनातून सादर केल्याचे दिसते.

या कार्यशाळेसाठी ३५० हून अधिक विद्यार्थी व शिक्षक ऑनलाईन पद्धतीने उपस्थित होते. स्वागत व प्रास्ताविक डॉ. प्रसाद दावणे यांनी केले. पाहुण्यांची ओळख डॉ. सुशांत माने यांनी करुन दिली. सूत्रसंचालन डॉ. नितीन रणदिवे यांनी केले. डॉ.संजय चोपडे यांनी आभार मानले.

0 9 FEB 2025

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी
BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nimit Corner Appartment, Kolhapur
Mob.- 9175089609

# श्याम बेनेगल यांची नायिका पुरूषसत्ताक व्यवस्थेला प्रश्न विचारणारी: डॉ. चंद्रकांत लंगरे

## शिवाजी विद्यापीठात दोनदिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्राचे उद्घाटन

कोल्हापूर :

ज्येष्ठ दिग्दर्शक श्याम बेनेगल यांच्या समग्र चित्रपटांतून पुरुषसत्ताक व्यवस्थेला प्रश्न विचारणारी नायिका प्रखरतेने दिसते, असे प्रतिपादन ज्येष्ठ चित्रपट अभ्यासक डॉ. चंद्रकांत लंगरे यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या स्त्री अभ्यास केंद्रांतर्गत आयोजित 'दिग्दर्शक श्याम बेनेगल यांच्या चित्रपटातील महिला प्रतिमा' या दोन दिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्राच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पुणे विद्यापीठाच्या संवादशास्त्र विभागाचे डॉ.विश्राम ढोले होते.

डॉ. लंगरे म्हणाले की, बेनेगल यांच्या चित्रपटांतील महिलांच्या व्यक्तिरेखा विचार करण्यास प्रवृत्त करणाऱ्या असून स्त्री समस्या त्यांनी स्त्रियांच्याच दृष्टिकोनातून मांडल्या. या चित्रपटांतील महिला व्यक्तिरेखा या आपल्या समस्यांची उत्तरे शोधणाऱ्या खऱ्या 'नायिका' असून त्यामुळेच त्या आजच्या काळाशी सुसंगत वाटतात.

अध्यक्षीय भाषणात डॉ. विश्राम ढोले म्हणाले की, श्याम बेनेगल यांचे चित्रपट म्हणजे व्यावसायिक व समांतर अशा दोन प्रवाहांना



जोडणारा महत्त्वाचा दुवा आहेत. व्यावसायिक व वास्तविक सिनेमांचा सुंदर मिलाफ त्यांनी कल्पकतेने साकार केला.

यावेळी स्त्री अभ्यास केंद्राच्या संचालक डॉ. निशा मुडे-पवार यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. चित्रपट समीक्षक सर्फराज मुल्ला यांनी मार्गदर्शन केले. अश्विनी कांबळे यांनी आभार मानले. याप्रसंगी नांदेड विद्यापीठाचे डॉ. राजेंद्र गोणारकर, एमजीएम औरंगाबाद विद्यापीठाच्या डॉ. विशाखा गारखेडकर, एफटीआयआय पुण्याचे डॉ.प्रसाद ठाकूर, डॉ. चेतना सोनकांबळे, डॉ. शिवाजी जाधव, डॉ. चंद्रशेखर वानखेडे, डॉ. अंबादास भासके, डॉ. नितीन रणदिवे, विठ्ठल एडके, दिग्विजय कुंभार, रोहिणी साळुंखे, शैलेश कोरे व विजय जाधव यांच्यासह संजय घोडावत विद्यापीठ तसेच निटवे महाविद्यालयातील पत्रकारितेची विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### उद्या शोधनिबंध सादरीकरण

या चर्चासत्रासाठी २० शोधनिबंध आले असून त्यांचे सादरीकरण आणि 'श्याम बेनेगल यांच्या चित्रपटांतील गाणी' या विषयावर संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या माजी प्रमुख डॉ.अंजली निगवेकर यांचे उद्या मार्गदर्शन होणार आहे, अशी माहिती डॉ. निशा मुडे-पवार यांनी दिली आहे.